# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः21.09.2023** **वारः गुरुवार**

---

**जन आरोग्य योजना**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात मागील वर्षभरात सरकारतर्फे 249 कोटी 47 लाख 92 हजार रुपये खर्च करून रुग्णांवर मोफत उपचार केले आहेत. 2022 वर्षापासून आत्तापर्यंत कर्करोगासह एकंदर 1,07,037 रुग्णांनी उपचार घेतले आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये 996 शस्त्रक्रिया, तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत 1209 शस्त्रक्रिया, आदींचा समावेश होतो. लवकरच महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून देखील लाभार्थ्यांना पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत मिळणार आहेत.श्री गणेशाच्या आगमनानंतर आज घरोघरी वाजत गाजत ज्येष्ठा गौरीचं आगमन होत आहे . गौरींच्या स्वागतासाठी गृहिणींची लगबग सुरु असून,बाजारपेठेत नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली आहे .

**दूध भेसळ विरोधी समिती**

सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा दूध भेसळ विरोधी समितीच्या वतीन मागील एक महिन्यापासून दूध आणि दुग्धजन्य पदार्थ तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत जिल्ह्यातील 151 नमुने सीलबंद करून तपासणीसाठी पाठविले आहेत. पथकाने एकूण 57 ठिकाणी छापे टाकले . त्यापैकी 25 जणांवर खटले भरून दंडात्मक कायदेशीर कारवाई केली आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय सचिव तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली हि कारवाई करण्यात आली .

**निधी**

पुणे शहरातील कात्रज - कोंढवा रस्त्याच्या कामासाठी महापालिका कर्मचार्यांना सातव्या वेतन आयोगासाठी ठेवण्यात आलेल्या तरतूदीमधून 30 कोटींचे वर्गीकरण करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे कात्रज कोंढवा रस्त्यांच्या कामाला गती मिळणार आहे. महापालिका कर्मचार्यांना सातव्या वेतन आयोगाचा फरक टप्पाटप्प्याने देण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेच्या

अंदाजपत्रकामध्ये 130 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी 30 कोटी रुपयांच्या वर्गीकरणास स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

**आजार मृत्यू**

पिंपरी चिंचवड शहरात डेंग्यू, चिकनगुनिया आणि हिवताप या साथीच्या आजारांचा वेगाने प्रादुर्भाव होत आहे. या कीटकजन्य आजाराच्या प्रादुर्भावामुळे दोन लहान मुलांचा मृत्यू झाला आहे. चिखलीतील जाधववाडी मधील पाच वर्षीय बालकाचा आणि दहा वर्षीय मुलीचा डेंग्यू सदृश आजाराने मृत्यू झाला आहे. दोघांवरही पुण्याच्या रुग्णालयात उपचार सुरू होते मात्र दोघांची डेंग्यू चाचणी नकारात्मक आली होती . कीटकजन्य आजाराची लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या सरकारी रुग्णालयात तपासणी करून घेण्याचे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केली आहे.

**पुणे फेस्टीव्हल**

कला, संस्कृती, आणि क्रीडा यांचा मनोहारी संगम असणाऱ्या 35 व्या पुणे फेस्टिव्हलचे उद्घाटन उद्या पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते श्री गणेश कला क्रीडा रंगमंच, इथ होणार आहे . यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत ,उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.ज्येष्ठ अभिनेत्री नृत्यांगना पद्मश्री खा. हेमामालिनी पुणे फेस्टिव्हलच्या पॅट्रन असून त्यांनी गेली 30 वर्षे विविध बॅले, गणेश वंदना ,शिवस्तुती पुणे फेस्टिव्हलच्या मंचावर सादर केली आहे. यंदा देखील उद्घाटन सोहळ्यात त्या गणेश वंदना सादर करणार असून दुसऱ्या दिवशी शनिवारी ‘गंगा’ बॅले त्या सादर करतील. पुणे फेस्टिव्हलमध्ये त्यांनी दिलेल्या अभूतपूर्व योगदानाबद्दल यंदा उद्घाटन सोहळ्यात त्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. तसच ज्येष्ठ अस्थीरोगतज्ज्ञ पद्मविभूषण डॉ. के. एच. संचेती यांना यावर्षी पुणे फेस्टिव्हल जीवनगौरव पुरस्काराने तर घोडावत ग्रुपचे अध्यक्ष संजय घोडावत यांना‘पुणे फेस्टिव्हल अवार्ड’ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**‘दप्तराविना शाळा’**

शैक्षणिक क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सर्व 128 शाळांमध्ये दर शनिवारी ‘दप्तराविना शाळा’ हा उपक्रम सुरू केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका झाला आहे दर शनिवारी शाळेचा वेळ आता गीत, कविता, गायन, प्रश्नमंजुषा, शाब्दिक खेळ, पाककला, चित्रकला, मैदानी खेळ अशा विविध उपक्रमांनी भरलेला आहे.

**नियुक्ती**

भाजपचे प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर यांची पुणे शहर महायुतीच्या समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली.  प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, शहराध्यक्ष धीरज घाटे, यांच्या हस्ते आज खर्डेकर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

**स्पर्धा**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत.या स्पर्धेत ऋत्विक महाजन याच्या 73 धावांच्या खेळीमुळे कल्याण इलेव्हन संघाने युनायटेड थंडरझ्चा 55 धावांनी पराभव करत सलग पाचवा विजय मिळवला. अन्य दुसऱ्या सामन्यात संतोषकुमार सांगळे याच्या फलंदाजीच्या जोरावर टायटन बुल्स् संघाने लिजंड्स स्पोर्ट्स क्लबचा 2 गडी राखून पराभव करत चौथा विजय नोंदविला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज  दिवसभरात काही ठिकाणी  मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या  सरी बरसल्या .उद्या ही शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे .

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**